0 4 SEP 2025

आउटलूक व्ह्यू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वि.स. खांडेकर यांचे साहित्य बंदा रुपयाप्रमाणे खणखणीत: कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

कोल्हापूर : ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांचे साहित्य आजही बंदा रुपयाप्रमाणे खणखणीत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे वि.स. खांडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रामधील निवडक व्याख्यानांचे 'नंदादीप' या डॉ. रणधीर शिंदे व डॉ. नंदकुमार मोरे संपादित ग्रंथाचे आज कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता, डॉ. सुनीलकुमार लवटे आणि राम देशपांडे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, खांडेकर यांच्या सुवर्णस्मृती वर्षाचा आरंभ हा या ग्रंथाच्या प्रकाशनाने होतो आहे, याचा आनंद वाटतो. या निमित्ताने पुढील वर्षभरात विद्यापीठाच्या वतीने विविध उपक्रमांचे



आयोजन करण्यात यावे, यासाठी मराठी विभागाने पुढाकार घ्यावा, अशी सूचना त्यांनी केली.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी विद्यार्थीदशेपासून आपल्यावर खांडेकर यांच्या पडलेल्या प्रभावाचे विवेचन केले. माझ्या घडण्याचे संपूर्ण श्रेय हे खांडेकरांचेच असून त्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठीच त्यांच्या अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन करण्याचा उपक्रम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले. येत्या वर्षभरात खांडेकरांचे ३ प्रस्तावना खंड, २ समीक्षा खंड, २ कादंबऱ्या, १ चरित्रग्रंथ, १ पत्रसंग्रह आणि त्यांनी जपून ठेवलेल्या विविध वर्तमानपत्रांतून त्यांनी खुणा केलेले संदर्भ यांचा 'रायटर्स एट वर्क'च्या धर्तीवर मागोवा ग्रंथ असे एकूण १० ग्रंथ आपण प्रकाशित करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रकाशक अनिल मेहता यांनी खांडेकरांचे समग्र साहित्य मेहता प्रकाशनामार्फत वाचकांना सादर करण्याचा आगळा आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे सांगितले. खांडेकर यांचे लेखनिक म्हणून काम पाहिलेल्या राम देशपांडे यांनी खांडेकर हे माणूस म्हणून किती उच्च कोटीचे होते, हे दर्शविणाऱ्या अनेक आठवणी यावेळी सांगितल्या.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्ता मचाले, डॉ. सुखदेव एकल, रवी लोंढे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे खांडेकर यांच्या ४९व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. उदयसिंह राजेयादव उपस्थित होते.

0 4 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करा

## शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशासनाच्या सूचना ; शासनाच्या धोरणावर टीका करू नका

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : बायोमेट्रिक हजेरी, सीसीटीव्हीच्या परिपत्रकापाठोपाठ आता शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने सोशल मीडिया वापराबाबतचे परिपत्रक काढून शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना सूचना केल्या आहेत. त्यात प्रत्येकाने सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा. राज्य-केंद्र शासनाच्या धोरणांवर टीका करू नका, आदी सूचनांचा समावेश आहे.

राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यापार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्याबाबतचे परिपत्रक मंगळवारी काढले आहे. त्यात अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी आणि सेवकांनी सोशल मीडियाचा वापर अत्यंत जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.

वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया अकाउंट स्वतंत्र ठेवावेत. केंद्र अथवा राज्य शासनाने



बंदी घातलेल्या वेबसाईट, ॲपचा वापर करण्यात येऊ नये. वैशिष्ट्यपूर्ण शासकीय कामाबाबत मजकूर पोस्ट करता येईल. मात्र, त्याद्वारे स्वयंप्रशसा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, मानहानीकारक, भेदभाव उत्पन्न होणारे मजकूर शेअर, अपलोड अथवा फॉरवर्ड करू नका, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने केल्या आहेत.

दरम्यान, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांकडे त्यांच्याशी संबंधित नसलेल्या व्यक्तीकडून संस्थेविषयी अथवा विद्यापीठ, कर्मचाऱ्यांविरूद्ध केलेल्या तक्रारीचे अर्ज प्राप्त होतात. त्या अर्जाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्याची सूचनाही परिपत्रकाद्वारे विद्यापीठ प्रशासनाने केली आहे.

### विद्यापीठाला शनिवारी पूर्ण सुटी

**अनंत चतुर्दशीनिमित्त विद्यापीठाला शनिवारी (ता. ६) पूर्ण दिवस सुटी असणार आहे. कुलगुरूंनी त्यांच्या अधिकारातील राखीव अर्धी सुटी त्यादिवशी जाहीर केली आहे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 SEP 2025
तरूण भारत

# सोशल मीडियावर चुकीची कमेंट केल्यास कारवाई होणार

▪ विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना सूचना

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शासन आदेशाला डावलून सोशल मीडियावर चुकीची कमेंट केल्यास कारवाई केली जाईल, असे पत्रक शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने काढले आहे.

सर्वच क्षेत्रात सोशल मीडियाचा वापर वाढत आहे. एखादी गोष्ट सोशल मीडियावर खूप फिरते. यातूनच काही सरकारी कर्मचाऱ्यांनी कशा प्रकारे चुकीच्या कमेंट केल्या आहेत. हे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाने सरकारी कर्मचाऱ्यांना सोशल मीडियावर कमेंट करण्यास बंदी घातली आहे. याचा आधार घेत विद्यापीठ प्रशासनाने कशाप्रकारे कारवाई केली जाईल, याची माहिती विद्यापीठांतर्गत शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिली आहे. त्यामुळे सोशल मीडियावर शासन आदेश डावलून कमेंट केल्यास कारवाई होणार, हे निश्चित आहे. शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कोणतीही कमेंट करू नये, अशा सूचना दिल्या आहेत.

0 4 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिटणीतील माजी सैनिक पत्नीसह गिरविणार 'दूरशिक्षण'चे धडे



कोल्हापूर : हिटणी येथील माजी सैनिक बसगोंडा पाटील आणि त्यांच्या पत्नी स्मिता या बी. ए. अभ्यासक्रमाला प्रवेशित झाल्या आहेत. त्यांचे स्वागत शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. यावेळी व्ही. बी. शिंदे, चांगदेव बंडगर, सचिन भोसले, नितीन रणदिवे उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. ३ : मूळचे गडहिंग्लज तालुक्यातील हिटणी येथील साठवर्षीय माजी सैनिक बसगोंडा पाटील यांनी पत्नी स्मिता यांच्यासह राहिलेले अपूर्ण शिक्षण पूर्ण करण्याचा चंग बांधून तो पूर्णत्वाकडे नेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत शहाजी छत्रपती महाविद्यालयात बी.ए.भाग एकमध्ये प्रवेश घेतला आहे.

विशेष म्हणजे दोघांनीही वेगवेगळे ऐच्छिक विषय ठेवलेले आहेत. त्यांचा यामागचा महत्त्वपूर्ण दृष्टिकोन आहे की, वेगवेगळ्या विषयांचे ज्ञान आपणास मिळाले पाहिजे. त्याचा उपयोग कुटुंबातील सर्वांना झाला पाहिजे, असे मत पाटील दांपत्याने व्यक्त केले. बसगोंडा पाटील हे सैन्यदलात भरती झाल्यानंतर त्यांनी लखनौ, वेलिंग्टन, गुवाहाटी, कोलकाता, आग्रा, पुणे, श्रीनगर, कामठी (नागपूर), दिल्ली, इलाहाबाद (प्रयागराज) येथे एकूण २० वर्षे आर्मी डेंटल कोरमध्ये डेंटल हायजिनिस्ट म्हणून कामकाज पाहिले आहे.

पत्नी स्मिता यांनी पुणे येथून डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पूर्ण केले. नवी दिल्ली येथे दोन वर्षे राज्य सभेच्या संसदीय अधिवेशन कार्यकाळात युगपत भाषांतरण सलाहकार म्हणून काम पाहिले आहे.

पाटील दांपत्याने प्रवेश घेतल्याबद्दल 'दूरशिक्षण'चे संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर, प्रा. डॉ. सचिन भोसले, डॉ. नितीन रणदिवे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 SEP 2025
पुढारी

# माजी सैनिक पत्नीसह गिरविणार दूरशिक्षणाचे धडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना व अपूर्ण शिक्षण पूर्ण करू इच्छिणाऱ्यांना संधी उपलब्ध करून देत आहे. याअंतर्गत गडहिंग्लज तालुक्यातील हिटणी येथील माजी सैनिक बसगोंडा तायगोंडा पाटील (वय ६०) आणि त्यांची पत्नी स्मिता पाटील यांनी राहिलेले अपूर्ण शिक्षण पूर्ण करण्याचा निर्धार केला आहे. त्यांनी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय येथे बी.ए. भाग १ मध्ये प्रवेश घेतला असून, दोघांनीही वेगवेगळे ऐच्छिक विषय निवडले आहेत.

04 SEP 2025

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वि. स. खांडेकरांच्या साहित्यविश्वाला उजाळा

## सुवर्ण स्मृती वर्षानिमित्त विविध उपक्रम

गुरुबाळ माळी
c-gurubal.mali
@timesgroup.com

### स्मृतीसंग्रहालयाचे होणार नूतनीकरण

शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर यांचे स्मृतिसंग्रहालय उभारण्यात आले आहे. स्मृती सुवर्ण वर्षाच्या निमित्ताने त्याचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. या शिवाय विद्यापीठाच्या वतीने वर्षभरात विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली आहे.



वि. स. खांडेकर

> खांडेकरांचे साहित्य वाचकांसमोर नव्याने पोचावे यासाठी राज्यातील विद्यापीठे, साहित्य व शैक्षणिक संस्थांनी विविध उपक्रम राबवावेत, त्यांचे साहित्य पुनर्प्रकाशित करण्याबरोबरच त्यांच्यावर विशेषांक काढावेत, अशी विनंती करण्यात येत आहे, त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.
>
> – डॉ. सुनीलकुमार लवटे, ज्येष्ठ साहित्यिक

**कोल्हापूर :** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांचे हे सुवर्ण स्मृती वर्ष. या निमित्ताने त्यांच्या अप्रकाशित आणि असंग्रहित साहित्याचे प्रकाशन करण्यात येणार आहे. ज्येष्ठ लेखक व समीक्षक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या पुढाकाराने खांडेकरांच्या साहित्यविश्वाला नव्याने उजाळा मिळणार आहे. याशिवाय विविध शैक्षणिक, साहित्यिक संस्था, संघटनांच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करून, त्यांचे साहित्य समाजात नव्याने पोचविण्यात येणार आहे.

मराठी साहित्य विश्वात वि. स. खांडेकर यांचे स्थान अतिशय मोलाचे आहे. मराठीला पहिले ज्ञानपीठ मिळवून देणाऱ्या खांडेकरांनी कथा, पटकथा, कादंबऱ्या, नाटके, ललित लेख, निबंध, समीक्षा अशा विविध साहित्य प्रकारांमध्ये विपुल लेखन केले. त्यांची जन्मशताब्दी आणि त्यानंतर १२५व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दोन सप्टेंबरला त्यांच्या सुवर्ण स्मृती वर्षाचा प्रारंभ झाला. या निमित्ताने वर्षभर त्यांच्या अप्रकाशित आणि असंग्रहित साहित्य विश्वाला उजाळा देण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून त्यांच्या दहापेक्षा अधिक पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य लवटे यांच्या पुढाकाराने खांडेकरांचे अप्रकाशित साहित्य वाचकांसमोर आणण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रस्तावना खंड, समीक्षा खंड, अपूर्ण कादंबऱ्यांचे, तसेच निवडक पत्रांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. खांडेकर यांनी जवळपास दोनशे पुस्तकांना प्रस्तावना लिहिली होती. त्या सर्व प्रस्तावना एकत्र करून त्याचे पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यांनी केलेल्या ७५ साहित्यकृतींच्या समीक्षावर समीक्षा ग्रंथ काढण्यात येईल. 'वृंदावन' आणि 'वटपत्रे' या दोन अपूर्ण कादंबऱ्यांचे संपादन करून, त्याचे प्रकाशन करण्यात येईल. आगरकर यांच्यावर लिहिलेल्या 'दीपस्तंभ' या ग्रंथाचे पुनर्मुद्रण करण्याबरोबरच त्यांच्या निवडक पत्रांवरही एक पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे.

साहित्यनिर्मिती करताना खांडेकरांनी विविध वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतील काही संदर्भ घेतले. त्यावर काही खुणा केल्या होत्या. 'रायटर्स ॲट वर्क' या धर्तीवर खुणांचा आधार घेऊन, साहित्यनिर्मिती मागील शोधांचा चिकित्सा करणारा ग्रंथ प्रकाशित करण्यात येणार आहे. खांडेकरांचे साहित्य बहुतांशी सर्वच भारतीय भाषांत अनुवादित झाले आहे. याच पार्श्वभूमीवर आणखी काही साहित्य विविध भारतीय भाषांत अनुवादित करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 SEP 2025
तरुण भारत

# मुलींच्या वसतिगृहाला कंझ्युमर स्टोअरकडून गेट

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मुलींचे मुख्य वसतिगृहात सर्व अधिविभागाच्या विद्यार्थीनी राहतात. कंज्युमर स्टोअरनजीक कमवा व शिका आणि संशोधक विद्यार्थीनींचे वसतिगृह आहे. तसेच ॲड रूपाली पणदूरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुलींसाठी अभ्यासिका बांधण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य वसतिगृहातून अभ्यासिकेला जाण्यासाठी व संशोधक विद्यार्थीनींना मुख्य वसतिगृहात जेवायला येण्यासाठी कंज्युमर स्टोअरनजीक गेट करण्यात आले आहे. ये-जा करण्यासाठी हे गेट दिवसभर उघडे असते.

शिवाजी विद्यापीठातील कमवा शिका मुलींसाठी व संशोधक विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र वसतिगृह बांधण्यात आले आहे. या वसतिगृहातून मुख्य वसतिगृहात जेवायला जाताना फिरून जावे लागत होते. मुलींचा हा त्रास कमी व्हावा म्हणून मुख्य वसतिगृहाला कंज्युमर स्टोअरच्या बाजूने गेट करण्यात आले आहे. या गेटमुळे आता अभ्यासिकेतही अभ्यास करण्यासाठी जाताना या गेटचा वापर करता येणार आहे. रात्री हे गेट बंद केले जाते. सुरक्षेच्या दृष्टीनेही विद्यापीठ प्रशासनाने काळजी घेतली आहे.

**गेटवर सुरक्षा रक्षक तैनात**

मुलींच्या सुरक्षेची संपूर्ण खबरदारी विद्यापीठ प्रशासनाने घेतली आहे. त्यामुळे मुख्य वसतिगृहातून मुलींच्या अभ्यासिकेला जाण्यासाठी कंज्युमर स्टोअरकडून करण्यात आलेल्या नवीन गेटवरही सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आला आहे. मुलींना अभ्यासिकेत अभ्यास करायला जाण्यासाठी फिरून जावे लागणार नाही.

**डॉ. व्ही. एन. शिंदे** (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 SEP 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात हॉकीचे जादूगार म्हणून जगद्विख्यात असणारे भारताचे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा केला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, किरण पाटील, राजेंद्र रायकर, राम पवार, सुचय खोपडे, बृहस्पती शिंदे, मनीषा शिंदे, कृष्णात पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 SEP 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठास शनिवारी सुट्टी

कोल्हापूर : अनंत चतुर्दशी ( सार्वजनिक गणेश विसर्जन ) निमित्त शनिवार, दि. ६ सप्टेंबर रोजी शिवाजी विद्यापीठास सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आपल्या अधिकारात अर्धीऐवजी पूर्ण दिवस सुट्टी जाहीर केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 SEP 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाला शनिवारी सुट्टी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाला शनिवार दि. ६ सप्टेंबर रोजी सुट्टी राहणार आहे. कुलगुरूंनी आपल्या अधिकारातील अर्ध्या सुट्टीऐवजी संपूर्ण दिवसभर सुट्टी जाहीर केली आहे. याची अधिविभाग, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवकांनी दखल घ्यावी, असे परिपत्रक कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काढले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 SEP 2025
तरुण भारत

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहीर निविदा सूचना

सन 2025 ते 2026 या एका वर्षासाठी शिवाजी विद्यापीठातील विविध विभागातील व अधिविभागांतील प्राध्यापक, अधिकारी इ. च्या नावांच्या पाटया, खोली क्रमांकाचे अक्षरलेखन, इमारतींच्या पोर्चवरील अक्षरलेखन, भिंतीवरील अक्षरलेखन कापडी फलक, डिजीटल फलक व डेड स्टॉक चे नंबर टाकणे इ. प्रकारची कामे वार्षिक कंत्राटी पध्दतीने करून घेणेकरीता मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. अधिकच्या तपशीलसाठी अभियांत्रिकी विभागाशी संपर्क साधावा. कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे, रद्द करणे अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार शिवाजी विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात आलेला आहे. निविदा भरून देण्याची अंतिम तारीख दि.16 / 09 / 2025 असुन निविदा शुल्क रू.300 / – इतकी राहील.

**Su/Engg/Civil/**
दि 04 / 09 / 2025

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव